# महिला आरक्षण:
# एक होकारात्मक भेदभाव

भारताच्या सर्व नागरिकांना 'दर्जाची व संधीची समानता' प्राप्त करुन देण्याचा निर्धार व आश्वासन भारतीय राज्य घटनेने, घटनेच्या प्रास्ताविकेत २६ नोव्हेंबर १९४९ रोजी दिलेले आहे. या देशातील सर्व नागरिकांना म्हणजेच सर्व जाती, धर्माच्या, स्त्री व पुरुषांना समानतेने वागवले जाईल व समाजात दलित, आदिवासी व स्त्रिया याप्रमाणे जे मागास व कमकुवत घटक आहेत त्यांना विकासाच्या विशेष संधी (आरक्षण इत्यादी) देऊन त्यांना सर्व समाजाच्या बरोबरीने आणण्याचा प्रयत्न केला जाईल, असे वचन देशातील सर्व नागरिकांनी व नागरिकांना दिलेले आहे. एका अर्थाने हे प्रत्यक्ष भारतीयाने स्वतःच स्वतःला दिलेले वचन आहे.

या वचन व आश्वासनाच्या पूर्तीची प्राथमिक जबाबदारी ही भारताच्या कायदे मंडळावर म्हणजे जे लोक संसदेत कायदे तयार करतात त्यांच्यावर आहे.

'सर्व नागरिकांना दर्जाची व संधीची समानता व विकासाच्या समान संधी मिळण्याच्या दृष्टीने राज्य घटनेने दिलित, आदिवासी इ. मागास घटकांना शैक्षणिक व राजकीय आरक्षण देऊन या घटकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने घटनेत आरक्षणाची तरतूद करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करुन ठेवली आहे. या राजकीय व शैक्षणिक आरक्षणाला प्रारंभ बिंदू आपल्याला महात्मा जोतिबाराव फुलेंच्या साहित्यात सापडतो. तर या सामाजिक न्यायाचे प्रात्यक्षिक (प्रॅक्टिकल) छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या करवीर संस्थांनामध्ये मागास जातींना शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचे धोरण राबवून केल्याचे दिसते.

दलित, आदिवासी या मागास जाती-जमातींच्या उत्थानासाठी जसे प्रयत्न झाले तसे प्रयत्न या समाजात तेवढ्याच मागास असलेल्या, समाजाची निम्मी लोकसंख्या असलेल्या स्त्रियांच्या उन्नतीसाठी असे प्रयत्न कमी प्रमाणात झालेले दिसतात.

स्त्रियांना विकासाच्या प्रक्रियेत सहभाग आणि संधीची समानत मिळण्याच्या दृष्टीने वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी बहुसंख्या पुरुषांचे वर्चस्व असलेल्या कायदेमंडळाने पाळली नाही, असे खेदाने म्हणावे लागते. स्त्रियांना विवाह-घटस्फोटाबाबत स्वनिर्णयाचा अधिकार, दत्तक  अधिकार तसेच संपत्ती व वारसाचा समान अधिकार देणाऱ्या 'हिंदू कोड बिलाला' संसदेत व संसदेबाहेर प्रंचड विरोध करण्यात आला. विशेष म्हणजे या बिलाच्या विरोधात झालेल्या मोर्चे- आंदोलनात स्त्रियांनाच वापरुन घेण्यात आले. पुढे हे बिल तुकड्या- तुकड्यांनी मंजूर झाले.

आज कुटुंब सत्ता आणि निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना काहीसे अधिकार मिळाल्याचे दिसत असले तरी उच्चस्तरीय राजकीय सत्ताकेंद्र व निर्णय प्रक्रियेत महिलांना बरोबरीचे स्थान देण्याची पुरुषप्रधानतेचा विचार असलेल्या स्त्री-पुरुष सत्ताधाऱ्यांची मानसिक तयारी होत  असल्याचे दिसत नाही.

भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधीच्या पुढाकाराने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्त्रियांना ३३ टक्के हिस्सा मिळण्यासाठी १९९३ साल उजाडावे लागले! पंचायतीत पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या या कारभारणींनी सर्व प्रकारच्या अडथळ्यांवर मात करीत, मार्ग काढीत गावाच्या विकास कामात आपला हातभार लावला. गावाच्या विकासात योगदान देणाऱ्या या पंचायतीतील कारभारणींच्या यशोगाथा जेव्हा समाजासमोर येऊ लागल्या, तेव्हा आता कुठे या महिला आरक्षणाला होणारा विरोध थोडासा मावळल्याचे दिसू लागले आहे. पंचायतीच्या सत्ता कारभारात भारतभर स्त्रियांना ५० टक्के (निम्म) वाटा द्यावा अशी समाजाची आजतरी तयारी व्हायला हवी. या अनुषंगाने महिला राजसत्ता आंदोलनाचा मागील दोन दशकांचा पंचायत कारभारणींसोबतचा अनुभव खूपच सकारात्मक आहे;राजकारणाची गोडी वाढविणारा आहे.

७३ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायतीत निवडून गेलेल्या महिलांनी गाव विकासाच्या-पिण्याचे पाणी, दारु, अत्याचार, शौचालय, आरोग्य, सफाई अशा नव्या मागण्या समोर आणल्या, गेले अर्धशतकभर गावाचा कारभार पाहणाऱ्या पुरुष सत्ताधाऱ्यांना हे प्रश्न कधी महत्त्वाचे का वाटले नव्हते? त्यामुळे गावाचा विकास हा एकतर्फी पुरुषी दृष्टीकोन व आत्मकेंद्री विचार यातून होत गेला. गेल्या २५ वर्षात या पुरुषांच्या विकास दृष्टीकोणाला बाईच्या विचारांची जोड मिळाली! देश पातळीवर व राज्यस्तरावरही आजपर्यंत विकासाला असा एकतर्फी पुरुषी दृष्टीकोन लाभला आहे. मात्र पंचायतीत तरी याला बाईच्या

मनाची जोड मिळाली आहे. महिलांना संसद व विधानभावनात ५० टक्के आरक्षण मिळाले, तरच हा ''सामायिक दृष्टीकोन'' निर्णायात व धोरणातही अनुभवायाला मिळेल. महिलांचा हा अनुभव धोरणाला ताकद देणाराच आहे. उदा. आपल्या परिवारातील अतिआजारी माणसाला अथवा लहान बाळासाठी आपण दूधाचं पातेलं झाकून व राखून का ठेवतो ? तर इतरांपेक्षा जास्त दूध त्यांनी प्यावं व बलवान व्हावं- असं वाटणं हाच ''होकारात्मक भेदभाव'' होय!

लातूर जिल्ह्यातल्या एका ग्रामीण बाईला 'बायांनी राजसत्तेत येणं का गरजेचं आहे' असं विचारल्यावर ती म्हणाली, ''भाऊ, निम्मंच दुध तापवलं तर ..... सायही निम्म्याच दुधाला येईल आणि न तापवलेलं दूध नासून जाईल.'' असं जे समर्पक उत्तर देते. त्याच प्रमाणे खरं तर आज पर्यंत लोकसंख्येत निम्म्या असलेल्या महिलांना सत्तास्थान आणि कारभारापासून दूर ठेऊन एक प्रकारे महिलांची ही विचार आणि कार्यशक्ती इथल्या व्यवस्थेने अक्षरशः कुजवली आहे.

''महिलांना आरक्षण'' हा मुद्दा तसं पाहिलं, तर अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून राजकीय विषय पत्रिकेवर होता. १९३० च्या दरम्यान ऑल इंडिया कौन्सिल, नॅशनल कॉन्सिल फॉर वुमेन इन इंडिया आणि वुमेन इंडिया असोसिएशन सारख्या महिला संघटनांनी राजकारणात महिलांची भागीदारी आणि निवडणुकीत त्यांना आरक्षण मिळावे, अशा मागण्या केल्या होत्या. मात्र राष्ट्रीय चळवळीसमोर तेव्हा प्रामुख्याने इतर महत्त्वाचे मुद्दे असल्याने ही मागणी मागे पडली. महिला संघटनांनी देश उभारणीत स्त्रियांचा हातभार लागण्याच्या दृष्टीने, त्यांना राजकारणात येण्याची संधी मिळावी, याकडे वारंवार लक्ष वेधले होते. महिलांची सक्रीय राजकारणातील भागीदारी व आरक्षण हा मुद्दा गेल्या सात दशकात अनेकदा चर्चिला गेला आहे. त्यावर चर्चा, परिसंवाद आणि या प्रश्नांच्या गाभ्यापर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने अनेकदा प्रयत्न करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात १९५० साली जेव्हा मागासवर्गीय जातींसाठी कालेलकर आयोग नेमण्यात आला, तेव्हा महिला आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला. पण प्रत्यक्षात त्या दिशेने काही घडले नाही. पुढे १९७५ साली महिलांच्या स्थितीचा अभ्यास करणाऱ्या राष्ट्रीय कमिटीने निवडणुकीच्या राजकारणात महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात यावी, अशी शिफारस केली. १९८८ साली धोरणात्मक मसुद्यात वरील मुद्यांवर शिक्कामोर्तब केले. स्व. राजीव गांधींच्या कारकिर्दीत, केंद्र सरकारने पंचायतराज विधेयक तयार केले. ते विधेयक १९९३ साली संसदेत पारित होऊन त्यांची अंमलबजावणी सुरु झाली. 'पंचायतराज' बाबतच्या इतिहासात डोकावून बघितले तर, १९५७ साली बलवंतराय मेहता कमिटीने पहिल्यांदा ही शिफारस केली होती. नंतर १९७८ साली अशोक मेहता कमिटीने ही शिफारस मजबूत करण्याच्या दृष्टीने, तर जी.वी.के.राव कमिटीने १९८३ साली अशाच सूचना केल्या. १९८६-८७ साली पंचायतराजच्या संकल्पना, मसुदा स्वरुपात सिंघवी कमिटीने तयार केला आणि सरतेशेवटी १९९३ साली ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती करुन त्याला कायद्याचे स्वरुप मिळाले. एप्रिल १९९४ मध्ये राजकीय सक्षमीकरणाची प्रक्रिया भक्कम करण्याच्या दृष्टीने प्रत्येक राज्याने वरील घटना दुरुस्ती राज्यपातळीवर मान्य केल्या. महिलांच्या राजकारणातील प्रतिनिधित्वाबाबत काही दशकांपासून जे विचारमंथन चालले होते, त्याची परिणिती पंचायतराज घटना दुरुस्तीतही झाली. राजकीय जाणतेपणाचा महिला चळवळीला मिळालेला हा एक शासकीय प्रतिसाद होय.

## महिलांची पंचायतराजमधील भूमिका व मूल्याधारित राजकारण

ग्रामपंचायत आणि नगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान ३३ टक्के आरक्षण महिलांना देण्याबाबत कायदा करण्यात आलेला आहे. शेकडो महिला संघटना, स्वयंसेवी संस्था, सामाजिक बांधिलकी मानणारे गट यांनी सातत्याने मांडणी केली होती की महिलांनी घराच्या चौकटीबाहेरच्या व्यापक निर्णयाच्या विश्वात यायला हवे. तळागाळातील विभागांपर्यंत राजकारण पोहचवायला हवे. या चिकाटीला ३३ टक्के आरक्षणाच्या रुपाने दार किलकिले झाले. समाजात परिणामकारक आणि सकारात्मक सामाजिक परिर्वन व्हावे, या दृष्टीने विश्वासार्ह आणि लिंगभेदाकडे संवेदनक्षमतेने बघणारे सामाजिक सांस्कृतिक वातावरण तयार होईल. या दृष्टीने महिला आरक्षण फार महत्त्वाचे ठरते. महिला आंदोलनं आणि सामाजिक काम करणारे गट या प्रश्नांबाबत लोकमत अनुकूल करण्यासाठी व याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी काम करीत आहेत. पुरुष प्रधान व्यवस्थेतील उणिवांवर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजनाने तळातल्या कार्यकर्त्यांपर्यंत हा विचार पोहचवण्याचा प्रयत्न सुरु आहे.

सुरुवातील निवडून आलेल्या महिलांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण होते आणि त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कारभाराबाबतही पूर्ण अनभिज्ञ होत्या. याच बरोबरचा दुसरा मोठा अडथळा, म्हणजे या महिलांच्या कुटुंबातील पुरुषांचे त्यांच्या

राजकीय कामात असलेले वर्चस्व. बऱ्याच ठिकाणी निवडून आलेल्या बाईचा नवरा आपल्या हातात कारभाराची सर्व सूत्रे घेऊन 'सरपंचपती' या नात्याने काम बघत होते. या परिस्थितीला तोंड देण्याच्या दृष्टीने महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविण्याची गरज होती. त्यांचे अधिकार, भूमिका आणि निर्णय प्रक्रियेत भाग घेण्याची त्यांची क्षमता, त्यांना जाणवून देण्यासाठी महिला संघटना, स्वयंसेवी संघटनानी जे प्रशिक्षणाचे विविध कार्यक्रम घेतले, त्याचा निश्चित उपयोग झाला. आज समाजातील संवेदनक्षम आणि उपेक्षित घटकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या महिला, बिजिंग परिषदेतील महिलाकेंद्री निर्णय व मूल्यांवर आधारित राजकारण करण्यात निश्चित हातभार लावित आहेत.

**बिजिंग परिषदेतील भारत व नंतर.....**

सन १९९५ साली बिजिंग येथिल आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत भारत सरकारने मान्य केलेल्या ५ प्रमुख शिफारशी तशा फारच महत्त्वाच्या होत्या.

शिक्षणावरील खर्चासाठी सरकारी उत्पन्नाच्या ६ टक्के रक्कम उपलब्ध केली जाईल. मात्र याबाबत अंमलबजावणी अर्थसंकल्पात शिक्षणासाठी करण्यात आली नाही. महिलांसाठी करायच्या योजनांमधधील ४१ टक्के खर्च हा शिक्षणासाठी करायचा आहे, तोही होत नाही.

माता- बालसंगोपन कार्यक्रमाचे सार्वत्रिकरण सद्यास्थिती पाहता आयसीडीएस (एकात्मिक बाल विकास योजना) योजनेंतर्गत ७५ टक्के समाजविभागात हा उपक्रम पोहचला आहे, परंतु त्याची गुणवत्ता व सामाजिक सुरक्षितता तपासण्याची गरज आहे. तेथे काम करणाऱ्यांना आजही सेवेकरीच मानले जाते.

महिलांसाठी राष्ट्रीय धोरण तयार करुन ते प्रत्यक्षात आणण्याची तरतूद करणे आवश्यक आहे. सक्षमीकरणाचे राष्ट्रीय धोरेण मार्च २००१ मध्ये फक्त स्विकारण्यात आले! अंमलबजावणीच्या बाबतीत महाराष्ट्राचं 'महिला धोरण'ही धुक्यात हरवलं आहे, याचा शोध घेण्याची गरज आहे. पहिलं महिला धोरण तयार करणाऱ्या महाराष्ट्राच्या जमिनीवर नेमकं काय उगवलय ते अभ्यासायला हवं.

महिलांच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्यासाठी महिलांच्या हक्कांसाठी स्वतंत्र आयोगाच्या स्थापनेबाबत बऱ्याच चर्चा झाल्यानंतर महिला आयोग आले. पण त्यांना पुरेशी यंत्रणाच नाही. तसेच कौटुंबिक हिंसाचाराबाबतचे विधेयकही मंजूर झाले, पण अंमलजबावणी फारच कमकुवत आहे. आज महिला सर्व निर्णय केंद्रात भागीदारी करीत असत्या तर या धोरणांना अंमलबजावणीचे पाय व समाजाचे पाठबळ मिळाले असते.

**राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न**

विविध संस्था संघटना परिसंवाद, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रचार साहित्य तयार करणे आणि याकामातून संघर्ष व समन्वयाचे जाळे तयार करणे, अशी महत्त्वाची कामे सातत्याने करीत असतात. दुसरीकडे महिला संघटनांनीही अंमलबजावणीसाठी तयार केलेला दबाव आणि संवेदनक्षम खासदारांच्या प्रयत्नातून ९ व्या लोकसभेने राष्ट्रीय महिला आयोगाचा कायदा मंजूर करुन घेतला (३० ऑगस्ट १९९०) यात मालिनी भट्टाचार्य, सुहासिनी अली, अमू स्वामीनाथम (मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष), मृणालताई गोरे, प्रमिलाताई दंडवते (जनता दल) यांचा समावेश होता.

महिलांचे सक्षमीकरण हा राष्ट्रीय धोरणाचा कार्यक्रम म्हणून कृती करण्याच्या दृष्टीने ठराविक काळात नियोजन ठरविणे बंधनकारक होते. धोरणामध्ये नमूद केल्याप्रमाणेच प्राधान्य देण्यात येत आहे, परंतु त्यासाठी पुरेसे बजेटही हवे. हा कृती कार्यक्रम परिणामकारक व्हायचा असेल, तर तो निश्चित स्वरुपाचा, गुतागुंत नसलेला, ठराविक कालावधीत नेमके उद्दिष्ट्य व लक्ष समोर ठेवून आखला गेला पाहिजे. त्याचे मूल्यमापन करण्यासाठी जास्तीत जास्त लोकांची भागीदारी होईल अशी रचना असावी. तसेच त्या कामासाठी निश्चितपणे साधने उपलब्ध करुन घ्यायला हवीत. पंचवार्षिक योजनेची आखणी करतांना असे मान्य करण्यात आले की, प्रत्येक खात्याने आणि मंत्र्यानी त्यांच्या एकूण खर्चातील ३० टक्के निधी महिलांच्या विकास कामासाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. महिला व बालविकास मंत्रालयाने योजना आखणे, अंमबजावणी करणे, देखरेख करणे व कृती कार्यक्रमांचे सामाजिक दृष्टीकोनातून जमाखर्च करणे, ह्या प्रत्येक टप्प्यावर पंचायतीराज ,

नगरपालिका, महिला आंदोलन, स्वयंसेवी संघटना यांची योग्य भागीदारी होईल, याबाबत दक्ष राहिले पाहिजे. याविषयाची अंमलजबावणी खूपच धीम्या गतीने, पण ही सुरु आहे- शासनाच्या मर्जीनुसार!

**महिला आरक्षण विधेयक: घाट मार्गातला अवघड प्रवास**

महिलांनी राजकारणात भाग घेतल्यास त्या धोरण ठरवण्यापासून लोकशाही कारभारापर्यंत महत्त्वाची कामगिरी बजावू शकतील, हा मुद्दा महिला चळवळीतील कार्यकर्ते, शासनकर्ते आणि संघटना सातत्याने मांडत आहेत. महिलांच्या भागीदारीमुळे लिंगभेदावर आधारीत विषमता कमी होण्यास नक्कीच मदत होईल, असे आपणाला खात्रीने वाटते. स्त्रियांना ज्या सामाजिक, राजकीय शोषणाला सारखे सामोरे जावे लागते, त्यांना संधी मिळाल्यास त्या स्वतःच याला आळा घालण्यासाठी कायदे करतील. महिला या गाव कारभारात स्थिरपणे, बांधिलकी मानून, अतिशय कष्ट करण्याच्या तयारीने व्यवहार करतील असे नक्की वाटते. पण त्यांना सत्ता देणार कोण? आजतागायत संसदेत निवडणुकांमधून १२ टक्क्यांचा आकडाही त्या पार करु शकलेल्या नाहीत. संविधानाने सर्व नागरिकांना समान अधिकार दिले आहेत. त्यात जात, धर्म, संप्रदाय, लिंग व वर्ग यावरुन भेद करण्यास मज्जाव करण्यात आला आहे. महिलांचा विकास व्हावा, यासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत, तरी त्यांच्या राजकीय भागीदारीच्या परिस्थितीत फारसा बदल झालेला जाणवत नाही.

त्यामुळेच ८१ व्या घटनादुरुस्तीचे विधेयक १९९६ साली १२ सप्टेंबर रोजी लोकसभेत दाखल करण्यात आले. संविधानाच्या ३३० कलमाप्रमाणे लोकसभेत आणि ३३२ कलमानुसर विधानसभेत एकतृतीयंश जागा महिलांसाठी राखून ठेवण्याची तरतूद केली. ह्या विधेयकाच्या कलम २ (२२) व ३(२)नुसार ह्या एकतृतीयांशमधील १/३ जागा अनुसुचित जाती व अनुसूचित जमातीतील महिलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद लोकसभा व विधानसभा दोन्हींसाठी करण्यात आली, मात्र ज्या राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशातून ३ पेक्षा कमी सभासद संसदेत असतील, त्यांचा अपवाद मानण्यात आला. सदर विधेयक छाननीसाठी त्या कमिटीच्या अध्यक्षा स्व. गीता मुखर्जीकडे सुपूर्द करण्यातही आले होते. सभासदांची मते जाणून या समितीने आरक्षणाला पाठिंबा देणारे व तो प्रत्यक्षात येऊ शकेल अशी पध्दत सुचविणारा अहवाल ९ डिसेंबर १९९६ रोजी लोकसभेत सादर केला. संसदेत चर्चेच्या काळात काही प्रादेशिक पक्षांनी सदर बिलाला कडाडून विरोध केला. संसदेत चर्चेदरम्यान आरक्षण ३३ टक्क्यांऐवजी लोकसभेत १५ टक्के तर विधानसभेत २५ टक्के द्यावे अशा निरनिराळ्या सूचना मांडण्यात आल्या. पण महिला आंदोलनाने त्या फेटाळून लावल्या.

सन १९९६ साली विधेयक संमत न होऊ शकल्याने आणि १९९८ डिसेंबर लोकसभा विसर्जित झाल्यामुळे मान्यतेची आशा संपुष्टात आली. डिसेंबर ९९ मध्ये ८४ वी घटनादुरुस्ती तर ११ ऑगस्ट२००० रोजी ८५ वी घटनादुरुस्तीच्या रुपाने हे विधेयक पुन्हा पुन्हा संसदेत मांडले गेले. पण काही पक्षांचा कडवा विरोध आणि सरकारने चर्चेसाठी विधेयक मांडण्यात केलेली कुचराई यामुळे सर्वांची मान्यता असूनही मंजूरी मान्यता मिळाली नाही. आजही संपूर्ण देश मंजूरीच्या प्रतिक्षेत आहे!

**महिला आरक्षणाची इतकी प्रतिक्षा का?**

याचा अर्थ 'नेमेचि येता पावसाळा' या उक्तीप्रमाणे गेली अनेक वर्ष संसदेचे अधिवेशन सुरु होणार म्हटले की ३३ टक्के महिला आरक्षणाची चर्चा रंगत जायची. कधी सत्तारुढ पक्ष आश्वासन द्यायचे, कधी महिला खासदार दिल्लीला धरणं धरायच्या, सह्यांची मोहीम, पोष्ट कार्ड, तार पाठविणे, ठिकठिकाणी सभा, छोटी-मोठी निदर्शने अशा मोहिमा जोरात घेतल्या जायच्या. सन १९९६ सालापासून असे प्रयत्न थोडे कमी-जास्त प्रमाणात, पण हे सुरु आहेत. स्व. खासदार गीता मुखर्जी यांच्या कमिटीकडे जाऊन, सगळ्यांची मते विचारुनही गाडं काही हलत नव्हते.''कधी होणार, होणार का?'' अशा शंका विचारत, सहमतीच्या रिंगणात हे महिला आरक्षण खितपत पडले होते.

नंतर मात्र जरा खात्री वाटू लागली होती. म्हणजे ६ मे २००८ रोजी राज्यसभेत एकदाचे हे विधेयक मांडले गेले. गेल्या २५ वर्षात या विधेयकाला, जो विरोध केला जातोय त्याबाबत थोडे सविस्तर मांडायला हवे.

१) बहुतांश राजकीय पक्ष म्हणजे राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्ष यांचा ३३ टक्के आरक्षणाला पाठिंबा आहे.मात्र काही पक्ष जसे समाजवादी पार्टी, जनता दल (संयुक्त), राष्ट्रीय जनता दल- यांचा सदर विधेयकाच्या सद्य-स्वरुपाला तीव्र विरोध आहे. महिला आरक्षणांतर्गत ओबीसी महिलांना आरक्षण दिल्यावरच विधेयकाला आम्ही समर्थन देऊ, असे त्यांचे म्हणणे आहे.

हा प्रश्न समजून घेतांना कार्यकर्त्यांचा बरेचदा गोंधळ होतो.

स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिला आरक्षणांतर्गत आरक्षण आहे, त्यामुळे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय महिलांना पोट आरक्षण मिळते. ओबीसी महिलांना लोकसभा व विधानसभेत आरक्षण मिळावे या मागणीला जन पाठिंबा आहे. मात्र त्याबाबत एक घटनात्मक पेच आहे. त्यामुळे सध्याचे महिला आरक्षण मंजूर झाले तर आपसूक मिळणार आहेच. म्हणजेच जो आरोप वरील पक्षांकडून केला जातो, की या विधेयकामुळे फक्त ''वरच्या वर्गातील व बॉब कटवाल्या महिला'' येतील हे खोटे आहे. (या पुरुष खासदारांची बॉब कटला विरोध करण्यामागील तात्त्विक भूमिका मात्र समजू शकलेली नाही.)

संसदेत ओबीसींना सर्वसाधारण आरक्षण नाही. म्हणजे ओबीसी आरक्षणाची तरतूद करण्यासाठी घटनेत बदल करावा लागेल. जाती-निहाय आरक्षणातून ३३ टक्के आरक्षण त्या-त्या जातीतील महिलांना दिले जाते. (इथे एक लक्षात घ्यायला हवे की आरक्षण जातीवर आधारित मिळते, स्त्री -पुरुष म्हणून नव्हे) मग संसदेत ओबीसी सर्वसाधारण आरक्षणाची मागणी का केली जात नाही? आज तरी ओबीसी आरक्षणाचा चेंडू न्यायालय, राज्य शासन व केंद्र शासन हे परस्परांवर फेकत आहेत. राजकीय पक्ष हा चेंडू निवडणूकीचं हत्यार म्हणून वापरत आहेत.

दुसरी सूचना काही लोकांकडून येते ती म्हणजे सध्या संसदेत खासदारांच्या एकूण संस्थेत ३३ टक्के वाढ करुन त्या जागा महिलांना द्याव्यात. याचा अर्थ इतकाच आहे की सध्याच्या मर्द खासदारांची, आहे त्यातील वाटा स्त्रियांना देण्याची तयारी नाही. सामाजिक न्यायाची भाषा बोलणाऱ्यांना असे मांडतांना त्याचे साधे भानही राहत नाही. जसे गावातील पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याच्या चळवळीऐवजी, वेगळ्या विहीरी बांधून देणे हा पर्याय होऊ शकत नाही; किंवा महिलांना काही देवळांमध्ये प्रवेश नाकारतात, तेव्हा स्त्रियांसाठी वेगळी मंदिरे बांधून घ्या, हा तोडगा समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने अहितकारक आहे. त्यामुळे त्यातील न्याय्यं वाटा महिलांना मिळालाच पाहिजे.

तिसरा मुद्दा जरा गमतीशीर आहे. म्हणजे इथेच पाणी मुरतयं, संसदेत काँग्रेस, भाजपा, कम्युनिस्ट या प्रमुख राष्ट्रीय पक्षांचा महिला आरक्षणाला पूर्ण पाठिंबा आहे. शिवाय राष्ट्रवादी कॉग्रेस,डिएमके सारखे इतर प्रादेशिक पक्षही सोबत होते. त्यांच्या खासदारांची संख्या बघितली, तर बहुमताच्या जोरावर हे विधेयक मंजूर करुन घेता येईल. मग सहमती करु या, याचा घोष का करावा लागतोय? याचे कारण पक्षांची मान्यता असली तरी, या पक्षांतील अनेक पुरुष आमदार-खासदारांना आपले विजयी अड्डे गमवायचे भय आहे.

आता आणखी एक मुद्दा येतो, की सध्या ३३ टक्के नको २५ टक्के आरक्षण देऊ या. या मागणीला कारणे दिली जात नाही. आता तर जे पक्ष ओबीसी महिला आरक्षणाच्या नावाखाली, हे विधेयक इतके वर्ष अडवित आहेत. तेच आता २५ टक्के महिला आरक्षणाचा तोडगा का सुचवित आहेत? ते म्हणताहेत, ''अहो, किती घाई करताय तुम्ही? स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला कसे काम करीत आहेत. कुठे फक्त नावापुरत्याच आहेत, याचा आधी अभ्यास तर करुया! '' खासदारांना सरकारी आकडे ठाऊक हवेत, की बऱ्याच राज्यांमध्ये ३३ टक्के आरक्षणाच्या संधीचे सोने केल्यामुळे तिथे स्थानिक स्वराज्य संस्थेत महिला निवडून येण्याचे प्रमाण ४०-४५ टक्क्यांपर्यंत गेले आहे. खरे म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये, प्रमुख्याने ग्रामपंचायत पातळीवर प्रस्थापित उतरंडीला हादरे बसू शकतात हे चांगले उमजल्यामुळेच महिला विधेयकाबाबतची घाई त्यांना नकोशी वाटत असावी. त्यांच्या अनुभवाला हे ही आले असणार की स्वतःच्या जागी पत्नीला निवडून आणले तरी ती कायम आपल्या अर्ध्या वचनात राहील याची खात्री राहिली नाही हो!

इथे नम्रपणे एक सांगावेसे वाटते, खासदार-आमदार म्हणून काम करतांना काही प्रमाणात सुरुवातीला काही महिलांना अडचणी येतील. जितक्या सहजतेने घर-संसार बायकोच्या भरवशावर टाकून पुरुषांना राजकारणात वावरण्याची मोकळीक असते, तशी स्त्रियांना मिळतेच असे नाही, त्यांना तारेवरची कसरत करावी लागेल, स्त्रियांच्या क्षमता वाढायला थोडा वेळही जाईल, कारण राज्य व देशाचा कारभार समजावून भागीदारी करणे सेपे काम नाही. पण एक सांगायला हवे की, पुरुष आमदार खासदारांच्या कारभार कारकीर्दीचाही मग आढावा घ्या, मग खरे चित्र उलगडेल. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले किती खासदार - आमदार आहेत. मौनी किती आहेत. टक्केवारी घेणारे किती? कार्यक्षमता ही स्त्री का पुरुष याच्यावर ठरत नाही. सक्षम पुरुष तसेच सक्षम महिला खासदार आहेतच!

**नि:शस्त्र क्रांती**

पंचायतराज संस्थांच्या कार्यासंबंधी केलेल्या एका अभ्यासात असे दिसून आहे की, किमान ५० टक्के स्त्री पंच व सरपंचांच्या यश मार्गात अविभाज्य अशी लिंगाधिष्ठीत कारणे आडवी येत नाहीत. खरेतर स्त्रियांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांचा खराखुरा वाटा असलेल्या ५० टक्के जागा, विधानसभा व लोकसभेत त्यांना का देऊ नयेत? म्हणूनच राजीव गांधींनी आरक्षणाची सुरुवात केली व पुढे आजच्या लोकसभा व विधानसभेतील आरक्षणासंबंधीजे विधेयक राज्यसभेत मांडले ही त्याची नांदीच म्हणावी लागेल. जी स्त्री निवडणूक जिंकते, ती राजकीय दृष्ट्या सक्षम होते पण निवडणूक लढवणाऱ्या सर्व महिला उमेदवार, तसेच ज्या स्त्रिया, आपल्यासारख्याच स्त्रियांना निवडणूक लढवतांना पाहतात- त्या सर्व स्त्रिया सामाजिक दृष्ट्या सक्षम होतात. तसेच ग्रामसभेतील सामान्य मतदार महिला आपल्यासारख्याच निवडून आलेल्या स्त्रियांशी अगदी सहज संपर्क साधू शकतात.

पुराणमतवादी व पारंपारिक ग्रामीण समाजात पंचायत आरक्षणाने जी काय असामान्य सामाजिक क्रांती झाली ती थक्क करणारी आहे! काही पुरुष राजकारण्यांनी व्यक्तीशः आपल्या स्त्री नातेवाईकांना कठपुतळ्या म्हणून उभे करण्याचा प्रयत्न करुनही ही प्रक्रिया उध्वस्त झाली नाही. पण असे किरकोळ प्रयत्न सोडता कोणत्याही प्रकारचा गंभीर सामाजिक तणाव निर्माण झालेला नाही.

आज, भारतातील निवडून आलेल्या महिलांची संख्या, उर्वरित जगातील निवडून आलेल्या महिलांपेक्षा जास्त आहे, असे आपण प्रमाणिकपणे व अभिमानाने म्हणू शकतो. ना जगात अशा प्रकारची क्रांती कोठे झाली ना इतिहासात अशा क्रांतीचा दाखला मिळतो!

सर्वात धक्कादायक म्हणजे एका सीमावर्ती राज्यातील मुख्यमंत्र्यांने बोलण्याच्या भरात धमकावले की, जर त्यांच्या राज्यात महिला आरक्षण लागू केले तर त्यांचे राज्य संघराज्यातून फुटून बाहेर पडेल. अल्पसंख्यांक, विशेषतः मुस्लिमांमध्ये या महिला सक्षमीकरणाचा काय अर्थ आहे त्याचे उदाहरण म्हणजे हरियाणातील मेटवाट जिल्ह्यातील निमखेडा हे अल्पसंख्यांक गाव आहे. येथे ज्यावेळेस रोटेशनने सरपंचपद महिलांसाठी आरक्षित झाले, त्यावेळेस गावातील पुरुषांनी एकत्र येऊन निवडणूक न लढवण्याचे ठरवले. कारण कुठल्याही पुरुषास स्त्रिच्या हाताखाली काम करण्याची कल्पना सहन होत नव्हती. ह्या विपरित कारणामुळे निमखेडा, भारतातली पहिली संपूर्ण महिला पंचायत ठरली!

पुरुषवर्गाने स्थानिक कारभाऱ्यांबरोबर कटकारस्थाने केली. ते निवडून आलेल्या संपूर्ण महिला पंचायतीकडे दुर्लक्ष करत. स्त्रियांनी 'गांधीगिरी'चा मार्ग स्विकारला. त्यांनी सर्वांनी आपले एकत्रित राजीनामा पत्र सादर केले. या गोष्टीची अपरिहार्यपणे 'बातमी' झाली. जर भारताच्या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागास भागात डोळ्याची पापणी लवते न लवते तोपर्यंत हे असे परिवर्तन घडत असेल तर माध्यमांतून प्रसिध्दी मिळणाऱ्या, महिला पंचायत सभासदांशी भेदभाव केल्याच्या घटनांपेक्षा संपूर्ण देशातील स्त्री सक्षमीकरणाची ही परिणामकारकता नक्कीच प्रभावी आहे.

राज्यघटनेप्रमाणे महिलांना ३३ टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असता कामा नये, याचा अर्थ ते जास्त असू शकते. नेहमी बिहारचे नाव सरंजामशाही, पारंपारिक, सामाजिकदृष्ट्च मागासलेले व कुंठित साचलेले तळे म्हणून सर्रास घेतले जाते. पण ५० टक्के महिला आरक्षणाचा कायदा करणारे पहिले राज्य म्हणून बिहारला श्रेय द्यायला हवे. निवडणुकीत ५५ टक्के महिला ग्रामपंचायतीत निवडून आल्या! टक्केवारीतच नाही तर प्रत्यक्षातही एकूण राखीव जागांपेक्षा जास्त स्त्रिया बिहारमध्ये निवडून आल्या.

आता बिहारने घालून दिलेले हे उदाहरण, महाराष्ट्र, छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान व हिमाचल प्रदेश यांनी उचलले तर त्यात आश्चर्य नाही. या सर्व राज्यांनी आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे तर सिक्कीमने ते ४० टक्क्यांपर्यंत वाढवले आहे.

छत्तीसगड व मध्यप्रदेश ही अशी राज्यं आहेत जेथे मानव विकास निर्देशांक अतिशय कमी आहे तसेच येथे मागासवर्गीयांची लोकसंख्या जास्त आहे. राजस्थानमध्ये खूप आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत. जो राजस्थान सतीप्रथेशी जोडला गेला होता तोच राजस्थान आज ५० टक्के महिला आरक्षणाशी (पंचायतराज) जोडला गेला आहे. स्वातंत्र्याच्यावेळी हिमाचल प्रदेशमध्ये स्त्री साक्षरतेचे प्रमाण सर्वात कमी होते, आज तेथेच साक्षरता प्रमाण जास्तीत जास्त असलेल्या राज्यात हिमाचल प्रदेश मोडतो आणि हिमाचल प्रदेश आज कितीतरी पुढे गेला आहे. भारतीय संघराज्यात आलिकडेच जोडला गेलेला

सिक्कीम, ज्याचा लोकशाहीचा अनुभव उरलेल्या देशाच्या अनुभवाच्या तुलनेत कमी आहे तो कितीतरी राज्यांपेक्षा पुढे गेला आहे. जर असे असेल तर पंचायतीमधील आरक्षणाच्या या सकारात्माक बाजूंचा आपण आशादायी राजकारणाकरिता पुनर्विचार करायला हवा. आरक्षण ही बाब अजिबात नकारात्मक नाही. पण अशा घटना घडल्या आहेत की काही मंडळी त्यांचे स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी या व्यवस्थेला अनेक प्रकारे सुरुंग लावायच्या प्रयत्नात आहेत.

आज घटनात्मक मंजूरी असलेली पंचायत व्यवस्था आणि उत्तरेकडील जात पंचायत जी ‘खाप पंचायत’ म्हणून ओळखली जाते व तामिळनाडूतील कट्टा पंचायत याबाबत लोकांच्या डोक्यात गल्लत होते. पंचायतराज व्यवस्थेचा खाप व कट्टा पंचायतीशी काही संबंध नाही.

**पण तरीही महिला म्हणून कोणती आव्हानं आहेत?**

या सर्व प्रवासात सर्वात मोठी अडचण जाणवते ती तत्पर माहिती मिळण्याची! कारभारातील ज्ञानाची!! आरक्षण मिळालं पण ‘कारभार ज्ञानबंदी’ चालूच राहिली. सरपंचपती, चारित्र्यहनन, भ्रष्टाचाराची भिती, निवडणुकीतल्या कायद्यांची भीती, माहिती मागायची भीती, फंड व हक्क मागायची भीती यातच बाई, आरक्षण मिळूनही गुदमरायला लागली! एकाबाजूला तिला गावासाठी चांगलं काम करावं, महिलांचे प्रश्न पुढे आणावेत, असं वाटायचं आणि दुसऱ्या बाजूला या भितींची भिंत! काही काम कराचयचं तर माहिती मिळविणे, ज्ञान मिळविणे कारभार समजणे व तो प्रत्यक्ष करणे यांवर पूर्ण बंदी असल्यासारखी पारंपारिक पंचायतीची स्थिती होती. निवडून यायला अनेक फॉर्म भरायचे तर पुरुषांची मदत हवी, स्वावलंबीपणे बाई निवडणूक लढू शकत नाही. भ्रष्टाचार, मटण, दारु, नवस आणि नवनव्या अटींच्या गर्दीत बाई हरवून जाते. निवडणूक म्हणजे गुंतवणूक! तिच्या हातात पैसा नसतो. त्यामुळे निवडणुकी-पासूनच ती परावलंबी होत जाते.

समजा ती निवडून आली तर प्रमाणपत्र, प्रशासन, प्रोटोकॉल, तिची कामं, अधिकार किंवा तिची बसायची जागासुध्दा तिला लवकर समजत नाही. माहिती ही दप्तरात बंद करायची गोष्ट असते हे आजही गुपित नाही! सरपंच- वहिनींना जितकं कमी कारभार ज्ञान कळेल, तितकं बरं अशीच ग्रामसेवकांची प्रामाणिक इच्छा असते.

पंचायतीत प्रवेश झाल्यावर जशी मूलभूत माहिती मिळत नाही तसेच प्रशिक्षणाचीही नेमकी व गुणवत्तापूर्ण काही सोय नाही. केरळ राज्य सोडल्यास विकेंद्रीकरणाचे धोरण कोणत्याही राज्यात नाही. प्रशिक्षणांची यादी व बजेट खूप मोठे, पण प्रशिक्षणाची अंमलबजावणी, जमेल तशा पध्दतीने चालते. पैसे आले तर, जमेल तसं प्रशिक्षण होतं. मात्र दरवर्षी खणखणीत कारभाराची माहिती देणारं दणदणीत गुणवत्तेचं प्रशिक्षणाचं धोरण अजूनही आपणाकडं नाही. त्यामुळे प्रशिक्षणाविना आरक्षण व माहितीविना कारभार शिक्षण या अवस्थेत महिला आरक्षण धीम्या गतीने प्रगती करीत आहे. आरक्षणाच्या धोरणाला संपूर्ण संरक्षणाची व निरंतर माहिती प्रसाराची जोड नसेल तर या आरक्षणाचा प्रभावही धीमाच राहणार ना!

स्वच्छ व पारदर्शी निवडणुक धोरण आहे पण प्रत्यक्ष वस्तुस्थिती उलट आहे! प्रशिक्षणाची योजना आहे परंतु नियोजन विस्कळीत! प्रशासकीय कारभाराच्या ओळखीचं धोरण तर अजिबात नाही, व त्याविषयी काही आस्थाही नाही! या तऱ्हेने महिला आरक्षण हे पंगू करण्याचं काम ही ‘पुरुषी, प्रशासकीय यंत्रणा व राजकारणी’ व्यवस्था करीत आहे. नोकरशाही या पंगूत्वानं आनंदी आहे. गाव नियोजनाचं कामसुध्दा महिलांना सोबत घेऊन केलं जात नाही. ‘‘आमचा गाव, आमचा विकास’’ ही योजना जोरात आली, परंतु निम्मी संख्या असलेल्या महिला व कारभारणी, त्या नियोजनात कुठे आहेत? त्यांच्या प्रश्नांचा किती विचार केला गेला? जी.पी.डी.पी. नावाने योजना मंजूर होत गेल्या, परंतु त्यात बाईला व तिच्या प्रश्नांना योग्य स्थान मिळायचं राहू द्या, गावाचे प्रश्नही त्यात नेमकेपणानं मांडले गेले नाहीत. माहिती शिवाय आरक्षण म्हणजेच ज्ञानाशिवाय सत्ता हाती देण्याचं हे धोरण यशस्वी व्हायचं तर ‘ज्ञान’ हे खुल्या मनानं व पध्दतशीरपणे नव्या लोकप्रतिनिधींपर्यंत इथ्यंभूत पोहचलं पाहिजे. आरक्षण दिल्यामुळे महिला व वंचितांच्या सत्ताबंदीवर एक घाव नक्की बसला परंतु ‘ज्ञानबंदीमुळे पुन्हा सत्ताबंदीकडे जाणारं हे आरक्षण’ प्रभावी व्हायचं तर सत्तेची व ज्ञानाची कवाडं महात्मा जोतिबांच्या विहीरीसारखी खुली करण्याची आज नितांत गरज आहे. पुरुषांनी घरातील कामं रोज अर्धा तास केली तर, त्यांची तब्येत चांगली राहील असा एक अभ्यास सांगतो. तसेच बालपणापासून मुलांना स्वयंपाकाचे धडे शाळेतूनच मिळाले तर पारंपारिक स्त्री-पुरुष भूमिकेतील विसंगती दूर व्हायला नक्की मदत होईल. कामाची विभागणी करतांना महिलांनीही घराबाहेरची कामं केली तर त्याही व्यवहारात कुशल होतील. बालपणापासून कारभाराचं राजकारण महिलांना समजत गेलं तर निवडणुकीची भीती, प्रशासनाविषयीचं अज्ञान,

राजकारणाबद्दलची निराशा व पुन्हा स्वयंपाकघरात महिलांचा 'यु टर्न,' बजेट व नियोजनाचा बागुलबुवा ही मानसिकता नामशेष व्हायला वेळ लागणार नाही!

थोडक्यात काय तर,सर्व परिवर्तन चळवळींना व राजकीय पक्षांना खालील आव्हानांबाबत गांभीर्याने जमीनीवरचा कार्यक्रम ठरवावा लागेल.

- अनुभवी, शहाणपण असलेल्या अर्धशिक्षित महिला कशा निवडून येतील?
- नवऱ्याची कठपुतळी म्हणून निवडून येणाऱ्या महिलांनी कारभार कसा करायचा?
- ग्रामसेवक व पुरुष कारभाऱ्यांचे, महिला कारभारणींशी भेदभावाचे वागणे कसे संपवायचे?
- अविश्वासाच्या ठरावाचा स्त्री सरपंचाविरुध्द गैरवापर कसा थांबवायचा?
- आणि महिला प्रतिनिधींना घालवण्यासाठी २ मुलांच्या कायद्याचा गैरवापर कसा रोखायचा?

ही आव्हानं आपणाला पेलायची आहेत.

सोशल मिडियाच्या जगात, नकारात्मक बाबींचे प्रसारण होण्याचे प्रमाण खुप असूनही आपण या स्त्रियांच्या स्थानासंबंधीचे आपल्या राज्यात वस्तुनिष्ठ व वैज्ञानिक सर्वेक्षण करायला हवे. केंद्र शासनाने NIELSON COMPANY- ORG MARG या निवडणूक सर्वेक्षण कंपनीस वेगवेगळ्या राज्यातील ग्रामपंचायतीमधील जवळपास २०,००० महिलांचे सर्वेक्षण करण्यास सांगितले. एक सल्लागार समितीही नेमली. त्या समितीच्या अध्यक्ष जवाहरलाल नेहरु विद्यापीठाच्या मा.निरजा गोपाल होत्या. सर्वात महत्वाचा निष्कर्ष म्हणजे ५० टक्के पंच-सरपंच महिलांना, लिंग या अर्थाने बाई म्हणून अडचणी येत नाहीत. म्हणूनच विधानसभा लोकसभेमध्ये, कमीत कमी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यामध्ये अडचण का यावी? महिलांचे लोकसंख्येतील प्रमाण ५० टक्के आहे. पंचायतीसाठी हे ३३ टक्के असलेल्या महिला ५० टक्क्यांपर्यंत जाऊ शकतात, हे पंचायतींनी दाखवून दिले आहे.

खरतर कायम स्वरुपी आरक्षण हे असूच शकत नाही परंतु महिला आरक्षण ही होकारात्मक भेदभावाची युक्ती आहे, व ही खरी लढाई नाही, ती एक रणनिती आहे! व्यापक परिवर्तनासाठी व भेदभाव विरहीत नव्या समाज रचनेच्या निर्मितीसाठी होकारात्मक भेदभाव ही परस्पर विरोधी संकल्पना वाटली तरी विविधतेने नटलेल्या आपल्या समाजातील विषमतेवरील तो एक जालिम उपायही आहे.

**भीम रासकर**
महिला राजसत्ता आंदोलन
मोबाईल-९८६९२५९१९४
ई-मेल : bhim.rscd@gmail.com

**संदर्भ**

- राजसत्तेतल्या कारभारणी विशेषांक, २०१६
- NIELSON COMPANY- ORG MARG अध्ययन २००९ (केंद्र शासन)
- भारताचे संविधान